ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
R. g. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ पुणें, बुधवार तारीख १ ऑगस्ट, १९५६ अंक ३१

## विविध माहिती

**युगोस्लाव्हिआकडून बोटींची खरेदी**—भारतीय सरकारनें युगोस्लाव्हिआकडून १०,५१० टन वजनाची बोट विकत घ्यावयाचें ठरविलें आहे. बोटीची किंमत १ कोटी रुपये आहे. ही बोट भारतामधील वेस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशनसाठी बांधण्यांत येणार असून ती १९५९ च्या जानेवारी महिन्यांत कॉर्पोरेशनच्या हवालीं करण्यांत येईल. दुसऱ्या एका बोटीच्या खरेदीविषयीं वाटाघाटी चालू आहेत.

**स्टॉकहोमजवळ बुद्धाचा पुतळा**—स्टॉकहोम बंदराजवळील एका बेटावर भगवान गौतमबुद्धाचा पुतळा सांपडल्याची बातमी स्वीडनमधील पत्रांनीं प्रसिद्ध केली आहे. हा पुतळा अवघा तीन इंच उंचीचा असून पितळ्याचा बनविलेला आहे. पुराणवस्तुशास्त्रज्ञांनीं असा अंदाज केला आहे कीं, तो १४०० वर्षांपूर्वीचा असावा. बुद्ध पद्मासनस्थ असून त्याच्या हातांत एक कमळ आहे.

**टाटा कारखान्याचा विस्तार**—टाटा लोखंड आणि पोलाद कारखान्याचा विस्तार करण्याची योजना आखण्यांत आली आहे. योजनेसाठी १३ कोटी डॉलर्स खर्च येणार असून ती प्रत्यक्ष अंमलांत आणण्यास १९५८ च्या मे मध्यें प्रारंभ होईल. कारखाना अद्ययावत् करण्यासाठी एका अमेरिकन कंपनीची मदत घेण्यांत आली आहे.

**भारताची पंचवार्षिक योजना**—अमेरिकन सरकारनें प्रसिद्ध केलेल्या एका प्रकाशनांत असें म्हटलें आहे, कीं साधनसंपत्तीच्या दृष्टीनें विचार करतां भारताची दुसरी पंचवार्षिक योजना वाजवीपेक्षा अधिक महत्त्वाकांक्षी वाटते. पण आर्थिक व सामाजिक प्रगति जलदीनें करण्याच्या जरूरीच्या दृष्टीनें ती वस्तुस्थितीला धरूनच आहे.

**अफूला चांगली मागणी येण्याची शक्यता**—आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत भारताच्या कच्च्या अफूला चांगली मागणी येण्याची शक्यता आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूचे मंत्री श्री. नारंगेलवाला हे ह्यासंबंधीं ब्रिटन, अमेरिका व जपान ह्या देशांचा दौरा करून परत आले आहेत. त्यांच्या मतानें, भारतीय अफूचा दर्जा व किंमत इतर देशांच्या स्पर्धेला तोंड देण्यासारखी आहे.

**गणित करणारा विजेचा 'मेंदू'**—कलकत्ता येथील आंकडेशास्त्रीय संस्थेंत गणित करणारा विजेचा 'मेंदू' बसविण्यांत आला आहे. ह्या गणिती यंत्राचें नांव 'उरल' असें आहे. यंत्राच्या साह्यानें पंचवार्षिक कार्यक्रमांत उद्भवणारे गणिती प्रश्न सोडविण्यांत येतील. त्याशिवाय भारतामधील इतर शास्त्रीय संस्थांनाहि त्याची मदत घेतां येईल.

**गुळाला चांगली मागणी**—श्रीरामपूर येथील गूळ बाजारांत गुळाला चांगली मागणी आली आहे. आंध्र, मद्रास व बिहार राज्यांतील व्यापारी खरेदी करण्यास आले होते. आंध्र राज्यांतील ४० व्यापाऱ्यांनीं ६५,००० रवे विकत घेतले. पण रेल्वेचे डबे न मिळाल्यामुळें माल पडून राहिला. गुळाच्या वहातुकीसाठी स्थानिक व्यापाऱ्यांनीं १०० डब्यांची तातडीनें मागणी केली आहे.

**उत्पन्न वाढविण्यासाठी कर**—कारवारच्या नगरपालिकेनें आपलें उत्पन्न वाढविण्यासाठी तीन नवे कर बसविण्याचें ठरविलें आहे. हॉटेलवरील कर, शिक्षणासाठी कर, आणि शहरांतून जाणाऱ्या मालावर कर, असे हे कर आहेत. प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यांत आल्यामुळें शिक्षणावरील खर्च वाढला आहे म्हणून शिक्षण-कर बसवावा लागत आहे.

**पाटणा येथें सायकलींचा कारखाना**—पाटणा येथें सायकली तयार करण्याचा नवा कारखाना स्थापन करण्यांत येण्याचा संभव आहे. कारखान्यासाठी ६ कोटी रुपयांचें भांडवल उभारावें लागेल, असा अंदाज करण्यांत आला आहे. दरसाल १ लाख सायकली तयार करण्यांत येतील. सायकलींशिवाय ऑटोरिक्षाहि तयार करण्यांत येणार आहेत.

**किडवाई ह्यांचें स्मारक**—भारताचे दिवंगत अन्नमंत्री श्री. रफी अहमद किडवाई ह्यांचें स्मारक त्यांच्या उत्तरप्रदेशांतील गांवीं उभारण्यांत येणार आहे. ज्या ठिकाणीं त्यांना दफन केलें त्या जागेवर ताजमहालच्या पद्धतीची इमारत स्मारक म्हणून बांधण्यांत येईल. इमारतीचा नमुना मंजूर झाला आहे. ती बांधण्यासाठी सुमारें १,२५,००० रुपये खर्च येईल.

**साखरेचा नवा कारखाना**—पश्चिम बंगालमधील अहमदपूर ह्या ठिकाणीं नॅशनल शुगर मिल्स लि. ही कंपनी साखरेचा कारखाना काढणार आहे. कारखान्याची उभारणी करण्याचें काम ग्लासगो येथील डंकन स्टुअर्ट अँड कंपनी ह्या संस्थेला मिळालें आहे. ह्या ब्रिटिश कंपनीकडून ३,००,००० पौंड किंमतीची यंत्रसामुग्री विकत घेण्यांत येणार आहे.

**रशिअन विमानांची खरेदी**—इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशनच्या हवाई मार्गावर वापरण्यासाठी भारतीय सरकार सहा रशिअन बनावटीचीं विमानें विकत घेणार आहे. त्यांच्या किंमती लवकरच ठरविण्यांत येतील. विमानें चालविण्यासाठी जरूर असणारे सुटे भाग व इतर यांत्रिक साधनेंहि खरेदी करण्यांत येतील. भारतीय हवामानांत विमानें कशीं काय चालतात, त्याची चांचणी करण्यांत येणार आहे.

**युद्ध चालू ठेवण्यासाठी करांत वाढ**—अल्जीरिआंतील युद्ध चालू ठेवण्यासाठी फ्रान्सच्या सरकारनें प्राप्ती करांत १० टक्के वाढ करण्याचें ठरविलें आहे. ह्या वाढीसाठी पार्लमेंटची मंजुरी घ्यावी लागेल. मंजुरी मिळाल्यास ह्या करांत चालू वर्षी दुसऱ्यांदा वाढ होईल. वृद्धांना जादा पेन्शन देण्यासाठी कर-वाढ नुकतीच करण्यांत आली आहे.

**कोळशाच्या खाणींसाठी यंत्रसामुग्री**—भारतीय सरकारच्या मालकीच्या कोळशाच्या खाणींत वापरण्यासाठी रशिआकडून यंत्रसामुग्री मागविण्यांत आली आहे. यंत्रसामुग्री कशी वापरावी तें भारतीय एंजिनिअर्सना शिकविण्यासाठी ६ रशिअन तज्ज्ञ भारतांत येण्यास निघाले आहेत. ६ महिने राहून ते तांत्रिक शिक्षण देतील.

**भडोचचा पाणीपुरवठा**—भडोच शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी ६४ लाख रुपयांची योजना तयार करण्यांत आली असून तिच्या कामास प्रारंभ झाला आहे. ह्या कामांसाठी भारतीय सरकारनें २१ लाख रुपयांची रक्कम मदत म्हणून मंजूर केली आहे.

**धोक्याच्या सांखळ्या काढून टाकल्या**—नॉर्थ ईस्टर्न रेल्वेच्या अधिकाऱ्यांनीं उतारूंच्या ३४ गाड्यांत असणाऱ्या धोक्याच्या सांखळ्या काढून टाकल्या आहेत. ह्या सांखळ्यांचा निष्कारण उपयोग करण्याची वाढती प्रवृत्ति दिसून आल्यामुळें त्यांनीं वरील निर्णय अमलांत आणला असल्याचें समजतें.

**बुडालेल्या बोटी काढण्यास मदत**—मुंबईच्या बंदरांत १९४७ व १९४८ च्या वादळांत तीन बोटी बुडालेल्या आहेत. 'रामदास', 'दीपावती' आणि 'लक्ष्मी' ह्या त्या तीन बोटी होत. बुडालेल्या बोटींचा नौकानयनाला धोका असल्यामुळें त्या वर काढणें जरूर आहे. हें काम करण्यासाठीं युगोस्लाव्हिआनें मदत देऊं केली आहे.

**चीनमधील सहकारी शेती संस्था**—चीनमधील सहकारी शेतीच्या संघटनेचा परिचय करून घेण्यासाठी भारतामधून एक अभ्यासमंडळ पाठविण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. सहकारी शेतीबाबत चीननें झपाट्यानें प्रगति केल्याचें नियोजन समितीला आढळून आलें आहे. अभ्यासमंडळ दोन महिने चीनला दौरा करील.

**गुजरातमधील शहरांना पाण्याचा पुरवठा**—गुजरातमधील १५ मोठ्या शहरांना पाण्याचा पुरवठा करण्याचीं कामें सध्यां चालू आहेत. ह्यापैकी बहुतेक कामें पुढील दोन वर्षांत पुरीं होतील असा अंदाज आहे. सर्व कामें पुरीं झाल्यावर ५ लाख लोकांना पाणीपुरवठ्याचा फायदा मिळेल. बहुतेक कामांसाठी मध्यवर्ती सरकारकडून व राज्य सरकारांकडून कांहीं रक्कम कर्जाऊ देण्यांत येणार आहे.

**पुरी स्टेशनाची नवी इमारत**—राज्यपुनर्घटना कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर जो दंगा झाला त्यांत पुरी स्टेशनच्या इमारतीची नासधूस झाली होती. आतां इमारतीची दुरुस्ती पूर्ण झाली आहे. तथापि सध्यांच्या इमारतीऐवजीं नवीन इमारत बांधण्याची योजना दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत समाविष्ट करण्यांत आली आहे. नवीन इमारतीसाठी २ लाख रुपये खर्च येईल.

**रशिआनें पुरविलेले ट्रॅक्टर्स**—भारताच्या अन्न व शेतकी खात्यानें १९५४ सालीं रशिआंतून ४ यंत्रचलित नांगर प्रयोग म्हणून आयात केले. प्रत्येक नांगराची किंमत ४,३८५ रुपये आहे. रशिआनें भारताला १९५५ सालीं एक नांगर देणगी म्हणून दिला. १९५६ सालीं ६६ नांगरांची देणगी रशिआकडून आली आहे.


## * दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड *

(शिड्यूल्ड बँक)

हेड ऑफिस :-१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :-८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, (फोन २७६३) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, (फोन ३०४०८)

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे | उपाध्यक्ष श्री. दा. ग. बापट

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५

खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज २॥ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, (बी. ए., (ऑ.), बी. कॉम, एलएल. बी.) मॅनेजर

तमाम दंतरोगांवर

माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

# अर्थ

बुधवार, ता. १ ऑगस्ट, १९५६





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## श्री. देशमुख ह्यांची यशस्वी कारकीर्द

श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं गेल्या आठवड्यांत आपल्या अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिला; त्यांच्या तत्त्वनिष्ठेला धरूनच तें झालें. पं. नेहरूंची थोरवी आपल्या सद्सद्विवेकबुद्धीच्या आड त्यांनीं येऊं दिली नाहीं. गेल्या सहा वर्षांतील त्यांची कामगिरी उत्कृष्ट दर्जाची झाली; अनेक परस्परविरोधी गोष्टींचा समन्वय साधण्यांत त्यांनीं यश मिळविलें. सुसंस्कृतपणा, सौजन्य व विद्वत्ता ह्यांची त्यांना पुष्कळच मदत झाली, आणि त्याकारणानें तिच्या कांहीं योजना कांहींना अप्रिय वाटल्या, तरी ते स्वतः व्यक्तिशः कधींच अप्रिय झाले नाहींत श्री. देशमुख ह्यांनीं भारताचीं आर्थिक सूत्रें हातीं घेतलीं, ती वेळ बरीच अडचणींची होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेस प्रारंभ झाला, तेव्हां तिच्या यशाबद्दल साधार चिंता वाटण्याजोगीच परिस्थिति होती. भारताच्या राजकीय स्थैर्यास व आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेस पंडित नेहरू हे मुख्यतः कारणीभूत मानले जातात; आर्थिक बाबतींत श्री. देशमुख ह्यांचें व्यक्तित्व व त्यांच्या सचोटीवरील, कौशल्यावरील व सावधगिरीवरील विश्वास ह्यांसहि मोठ्या प्रमाणांत श्रेय दिलें जाईल, ह्यांत संशय नाहीं. कोरियन युद्धामुळें निर्माण झालेले बिकट प्रश्न आणि तें युद्ध थांबल्यामुळें पुनः उद्‌भवलेल्या नव्या अडचणी, ह्या दोन्ही वेळीं श्री. देशमुख ह्यांनीं भारताचें तारू कुशलतेनें पैलतीराला नेलें आणि पंचवार्षिक योजनेच्या यशाचा पाया मजबूत केला. एस्टेट ड्यूटी, इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण, कंपनी कायद्यांत आमूलाग्र सुधारणा, इत्यादि बाबतींत त्यांनीं समाजवादी आर्थिक धोरण अंगिकारलें आणि भांडवलदार वर्गाच्या त्यांचेसंबंधीं आशा फोल ठरविल्या! आयुर्विम्याच्या राष्ट्रीयीकरणानें तर त्या व्यवसायाच्या स्वरूपांत फारच मोठा बदल घडवून आणला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आर्थिक तरतुदींत तुटीच्या अर्थव्यवस्थेस फार मोठें स्थान आहे; आणि ती योजना यशस्वी करण्यासाठी कर, कर्जें, ह्यांचाहि निष्ठुरतेनें अवलंब करावा लागणार आहे. त्यांतल्या त्यांत, चलनवाढीसाठीं रिझर्व्ह बँकेला आतां कायद्यानें जे व्यापक अधिकार दिले जात आहेत, ते नीट वापरले गेले नाहींत तर रुपया कोसळला जाऊन भारतावर भयंकर आपत्ति आल्याविना राहणार नाहीं. बेलगाम चलनवाढीला श्री. देशमुख ह्यांनीं कधींच पाठिंबा दिला नाहीं; त्यांनीं आपल्या कारकीर्दींत रुपयाची किंमत वाढविली असेंच आपणांस आढळतें. डॉ. के. पिक ह्या चलनविषयक तज्ज्ञानें घेतलेल्या आढाव्यांत म्हटलें आहे, "काळ्या बाजारांत रुपयावरील डॉलर प्रीमियम गेल्या वर्षीं ४% वर उतरला, ह्या विशेष उल्लेखनीय गोष्टीबद्दल भारतीय चलनाची व्यवस्था ठेवणारांचें अभिनंदन केलें पाहिजे." भारताच्या रुपयाच्या काळ्या बाजारांतील देवघेवी लवकरच अजिबात थांबतील, असा अंदाज त्यांनीं व्यक्त केला आहे. ह्याउलट, गेल्या वर्षी पाकिस्तानी रुपया ३०% डिस्कौंटवर होता! भारताच्या चलनाची प्रतिष्ठा आशियांतील इतर चलनांत अतिशय वरच्या दर्जाची आहे, असेंहि डॉ. पिक ह्यांनीं म्हटलें आहे. चलनवाढ मर्यादेंत राखून, रुपयाची किंमत कायम राखण्याचें महत्त्वाचें काम ह्यापुढील अर्थमंत्र्यांना प्रामुख्यानें करावें लागणार आहे. श्री. देशमुख ह्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण स्थानामुळें, भरधाव जाणाऱ्या योजनाकारांना जागरूकता आणि वास्तवता ह्यांची जाणीव करून देण्याचा त्यांना अधिकार होता. पक्षनिष्ठ अर्थमंत्र्याला हें साधणें अधिकच अवघड जाणार, हें उघड आहे. श्री. देशमुख ह्यांनीं गेलीं सहा वर्षें भारताची जी सेवा कार्यक्षमतेनें व कर्तव्यबुद्धीनें बजावली, त्याबद्दल देश त्यांचा ऋणीच राहील.

---

## दुग्ध-व्यवसायाच्या विकासाचा कार्यक्रम

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत दुधाच्या व्यवसायाचा विकास करण्याची योजना आंखण्यांत आली आहे. दुधापासून लोणी बनविणारे १२ कारखाने ग्रामीण विभागांत काढण्यांत येणार आहेत आणि दुधाचे इतर टिकाऊ पदार्थ तयार करण्याचे ७ कारखाने काढण्यांत येणार आहेत. हैद्राबाद, आंध्र, आसाम, बिहार, ओरिसा, पंजाब, उत्तर प्रदेश, राजस्थान, पेप्सु, मध्यप्रदेश आणि सौराष्ट्र इतक्या राज्यांतून हे कारखाने काढण्यांत येतील. महत्त्वाच्या शहरांना दुधाचा पुरवठा करण्यासाठी ३६ सहकारी संस्थाहि स्थापन करण्यांत येणार आहेत. ह्यापैकी दोन संस्था दररोज ५०० मण दुधाचा बटवडा करतील, ८ संस्था २५० मण दुधाचा बटवडा करणाऱ्या असतील, आणि २६ संस्था १५० मण दुधाचा बटवडा करणाऱ्या असतील. खेडेगांवांतून दुधाचें उत्पादन सहकारी पद्धतीवर संघटित करण्यांत येईल. ह्या पद्धतीनें दुधाचें उत्पादन होऊं लागल्यावर दूध पुरविणाऱ्या सहकारी संस्थांना आणि दुधाचे पदार्थ तयार करणाऱ्या कारखान्यांना दुधाची वाण भासणार नाहीं, असा अंदाज करण्यांत आला आहे. ज्या ठिकाणीं रोज १०० मणापासून २०० मणापर्यंत दूध मिळूं शकेल अशा ठिकाणीं लोणी तयार करण्याचीं केंद्रें उघडण्यांत येतील; आणि ज्या ठिकाणीं ३०० पासून ५०० मणापर्यंत दूध रोज मिळूं शकेल अशा ठिकाणीं दुधापासून टिकाऊ पदार्थ तयार करण्याचे कारखाने स्थापन करण्यांत येतील. गुरांची जोपासना, त्यांच्या औषधपाण्याची व्यवस्था, इत्यादि कार्यें करणारी जी प्रमुख ग्रामीण संघटना जवळपास असेल तिच्याशीं दुग्धव्यवसायाच्या योजना जोडण्यांत येतील.

---

## वर्ल्ड फायनॅन्स कॉर्पोरेशन

उत्पादक बिन-सरकारी उपक्रमांच्या वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी वरील संस्था स्थापन झाली आहे. ३१ राष्ट्रें तिचे सभासद झालीं असून सुमारें ८ कोटी डॉलर्सचें भांडवल जमा झालें आहे. जागतिक बँकेचे उपाध्यक्ष श्री. रॉबर्ट गार्नर, ह्यांनीं ती जागा सोडून कॉर्पोरेशनचें अध्यक्षपद स्वीकारलें आहे.

### हातमागाच्या धंद्याविषयीं शिफारस

भारतीय सरकारनें छोट्या उद्योगधंद्यांना उपयोगी पडतील, अशा प्रकारचीं यंत्रें तयार करण्याचें ठरविलें आहे. हीं यंत्रें कशा प्रकारचीं असावींत ह्यासंबंधीं अभ्यास करून शिफारसी करण्यासाठी सरकारनें तीन जर्मन तज्ज्ञांना भारतांत बोलाविलें होतें. त्यांनीं भारताचा दौरा करून कांहीं सूचना केल्या आहेत. अशा प्रकारचीं यंत्रें तयार करण्यासाठी कांहीं कारखान्यांना परवाने देण्यांत यावेत, त्या कारखान्यांच्या उत्पादनावर सरकारची सक्त नजर असावी, आणि हत्यारांचा दर्जाहि सरकारनें ठरवून द्यावा असें सुचविण्यांत आलें आहे. ज्या कारखान्यांना परवाने देण्यांत येतील त्यांना जरूर ती यंत्रसामुग्री व उपकरणें पुरविण्याची व्यवस्थाहि सरकारनें करावी. त्याशिवाय त्यांना लागणारा कच्चा माल आणि उत्पादित यांत्रिक हत्यारांची चांचणी करण्याची साधनेंहि सरकारतर्फे पुरविण्यांत यावींत अशी शिफारस करण्यांत आली आहे. हातमागावर काढण्यांत येणाऱ्या कापडाविषयींहि जर्मन तज्ज्ञांनीं कांहीं शिफारसी केल्या आहेत. त्यांत एक अशी आहे कीं, ज्या प्रकारचें कापड गिरण्यांत तयार होत नाहीं अशा प्रकारचें कापड निर्माण करण्यासाठी सध्यां अस्तित्वांत असलेल्या हजारो हातमागांचा उपयोग करण्यांत यावा. एका तज्ज्ञानें असें सुचविलें आहे कीं, सध्याच्या हातमागांच्या ठिकाणीं टप्याटप्यानें शक्तीवर चालणारे माग बसविण्यांत यावेत. हातमागावर तयार होणाऱ्या मालाची विक्री करण्याची जी संघटना आहे तींत सुधारणा करणें जरूर असल्याचें मत व्यक्त करण्यांत आलें आहे. त्यामुळें उत्पादन वाढून त्यांच्या किंमतीहि कमी होतील असा त्यांचा अभिप्राय आहे.

### नवी कर्ज-उभारणी

नव्या कर्ज-उभारणींपैकी ८०·५२ कोटी रु. व्हिक्टरी बाँड्सच्या कर्नव्हर्शनचे आहेत. चालू वर्षी १०० कोटी रु. चें कर्ज उभारण्याचा अर्थमंत्र्यांचा संकल्प आहे. तेव्हां आणखी २५-३० कोटी रुपयांचें कर्ज वर्ष संपण्यापूर्वी उभारलें जाण्याचा संभव आहे. आतांच्या कर्जउभारणींत सर्वांत जास्त रक्कम ६६·६४ कोटी रु. ३½% १९७४ च्या कर्जास मिळाली. त्यावर ३·८७% 'रिडेम्शन' व्याज सुटतें. स्टेट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचें उत्पन्न वाढविण्यासाठी सरकार एवढें व्याज देण्यास तयार झालें, असें म्हटलें जात आहे; राष्ट्रीयीकरण झालेल्या विमा कंपन्यांनीं त्यांत बरीच रक्कम गुंतवली असली पाहिजे.

### आकर्षक सौंदर्याचा आर्थिक लाभ

कु. कॅरोल मॉरिस ह्या अमेरिकन तरुणीला लाँग बीच (कॅलिफोर्निया, यु. स्टेट्स) येथील आंतरराष्ट्रीय सौंदर्यस्पर्धेत पहिला अनुक्रम मिळाला. जर्मन तरुणी दुसरी आली, स्वीडिश तरुणी तिसरी आली, इंग्लिश चौथी व इटालिअन पांचवी ठरली. कु. मॉरिस ही पोहोण्याच्या कलेंत निपूण असून, तिची उंची ५ फूट ७ इंच आणि वजन १२९ पौंड आहे. ह्या विश्वसुंदरीला सहा महिन्यांचा चित्रपटांत काम करण्याचा करार, पोहोण्याच्या पोषाकांचे कारखानदाराशीं ठिकठिकाणीं ह्या पोषाकांची जाहिरात करण्यासाठी हिंडण्याचा तीन महिन्यांचा करार, एक मोटार गाडी, एक पांढरा फॉक्स स्टोल (मौल्यवान् मोठा कोट) आणि इतर अनेक बक्षिसें ह्यांची प्राप्ति झाली आहे. सौंदर्यस्पर्धेत २९ देशांतील ७२ तरुणींनीं भाग घेतला होता.

### वीज पुरवठ्यांतील [illegible] गिरणी बंद
#### कामगारांना नुकसानभरपाई

सोलापूर मिलमध्यें ७,००० कामगार आहेत. १९५५ मध्यें ती गिरणी वीज पुरवठा कमी पडल्यामुळें दोनदां बंद पडली; एकदां ४ ऑगस्ट रोजीं आणि एकदां ६ सप्टेंबर ते ११ सप्टेंबरअखेर. जनरेटिंग यंत्रांत एकाएकीं बिघाड झाल्यामुळें वीज बंद झाल्यानें गिरणीहि बंद ठेवणें भाग पडलें. सोलापूर लेबर कोर्टांत हें प्रकरण गेलें, तेव्हां जज्जांनीं, गिरणी बंद राहिली त्या दिवसांचा निम्मा पगार सर्व कामगारांना देण्याचा गिरणीच्या चालकांना हुकूम दिला.

### कॉसमॉस बँकेंत टिळक जन्मशताब्दि महोत्सव

कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणें या बँकेनें दि २३-७-५६ रोजीं लोकमान्य टिळक जन्मशताब्दि समारंभ बँकेचे कार्यालयांत श्री. दा. वि. ऊर्फ बाबूराव गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं दुपारीं साजरा केला. त्यावेळीं लोकमान्य टिळकांच्या चित्राचें अनावरण, पुष्पहार समर्पण, वगैरे कार्यक्रम झाले. त्याप्रसंगीं बँकेचे अधिकारी मंडळांचे माजी व आजी सदस्य व सेवक उपस्थित होते. अध्यक्ष श्री. गोखले यांनीं आपल्या भाषणांत लो. टिळकांच्या विविध कार्याची व गुणांची माहिती देऊन कांहीं आठवणी सांगितल्या. या प्रसंगीं बँकेचे अध्यक्ष मा. ग. न. जेजुरीकर, कार्याध्यक्ष मा. स. वा. कुलकर्णी, सल्लागार मंडळाचे सदस्य मा. शं. ल. ओगले व बँकेचे उपकार्याध्यक्ष मा. वा. रा. होनप यांचींहि भाषणें झालीं.

### डॉ. मथाई व श्री. हुंडू

स्टेट बँकेचे चेअरमन, डॉ. मथाई, व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. हुंडू ह्यांनीं राजिनामा दिला आहे, पण त्यांत राजीनाम्याचीं कारणें दिलेलीं नाहींत. सप्टेंबर १९५६ अखेरपासून आपला राजिनामा अमलांत यावा, असें चेअरमननीं म्हटलें आहे. श्री. हुंडू ह्यांनीं सेवानिवृत्तीपूर्वीची रजा १ ऑक्टोबर, १९५६ पासून मागितली आहे व सेवानिवृत्त होण्यासाठी बँकेच्या सेंट्रल बोर्डाला ३ महिन्यांची नोटीस दिली आहे.

### बाँबे प्रॉ. को. इन्स्टिटयूटची निवडणूक

राज्यांच्या पुनर्घटनेनंतर, मुंबई राज्यांतील कांहीं प्रदेश अलग होऊन त्यांचा बाँबे प्रॉ. को. इन्स्टिटयूटशीं संबंध उरणार नाहीं. त्यामुळें, इन्स्टिटयूट सध्यांच्या स्वरूपांत राहील किंवा नाहीं, हा प्रश्नच आहे. म्हणून, चालू वर्षी एक्झिक्यूटिव्ह कमिटीची व्हावयाची निवडणूक पुढें ढकलण्यांत आली आहे.

### काश्मीरला जाणारे उतारू

गेल्या वर्षी बाहेरून ५०,००० प्रवासी काश्मीरला गेले. चालू वर्षी हा आकडा ६०,००० वर जाईल असा अंदाज आहे. बानिहाल बोगदा येत्या नोव्हेंबरमध्यें पुरा होईल व त्यामुळें श्रीनगर २० मैलांनीं जवळ येईल.

### चेक [illegible] लक्षांत ठेवण्याच्या [illegible]

दि. १८ जुलैच्या "अर्था"च्या अंकांत, चेक [illegible] लक्षांत ठेवण्याच्या १८ बाबी आम्हीं दिल्या होत्या. [illegible] बँकांनीं ह्या सूचनांचे कागद आपल्या काउंटरवर [illegible] त्या अंकाच्या जादा प्रतींसाठी मागण्या [illegible] तेवढे [illegible]ंक आम्हीं [illegible] आहेत.

## कै. प्राणलाल देवकरण नानजी

### ( श्रद्धांजली )

गेल्या आठवड्यांत शेठ प्राणलाल देवकरण नानजी यांच्या आकस्मिक निधनाची बातमी समजतांच व्यापारी, कारखानदार, विशेषतः बँकिंगचे जगतांत मोठा धक्काच बसला. गतवर्षीच हिंदी बँकांतले एक मोठे अध्वर्यू व तज्ज्ञ श्री. एच्. सी. कॅप्टन यांचे निधन झाल्यानंतर पाठोपाठ थोड्याच महिन्यांत शेठ प्राणलाल यांचीहि जीवनज्योत मालविली जावी ही घटना बँकिंग व्यवसायाचे दृष्टीनें शोचनीयच आहे. गेले कांहीं दिवस भारताची आर्थिक विकासाची वाटचाल जोरांत चालू असतां अनेक कर्तबगार मंडळींच्या अनुभवास आपण मुकत चाललों आहोंत आणि या विकासांत बँका आपल्या परीनें चांगला हातभार लावीत असतां प्राणलाल शेठजींचें निधन अकालीं झालें असेंहि म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

शेठ प्राणलाल देवकरण नानजी हे पिढीजात बँकर होते. इंग्रजींत ज्याला Indigenous Banker म्हणतात किंवा आपल्याकडे ज्याला 'सराफ' म्हणतां येईल त्यांत प्राणलाल शेठजींची गणना करतां येईलच. पण त्याबरोबरच आधुनिक हिंदी बँकिंगहि त्यांना चांगलेंच अवगत होतें. विशेषतः १९३८ सालीं देना बँकेच्या स्थापनेपासून त्यांचा आधुनिक बँकिंगशीं निकटचा संबंध आला होता. बँकिंगखेरीज त्यांचा विमा, सोनें, चांदी, कापूस बाजार, या व्यापारी जगताशीं संबंध होताच. परंतु बँकिंगबद्दल त्यांना विशेष आत्मीयता वाटत असे. गेल्या दोनतीन वर्षांपासून ते या इतर व्यापारी व्यवसायांतून निवृत्त होत चालले होते पण बँकिंगशी मात्र त्यांचा निकटचा संबंध अखेरपर्यंत राहिला होता. मृत्यूपूर्वी एकदोन दिवसच आधीं त्यांनीं आपल्या घरीं देना बँकेच्या संचालकांची सभा घेतली होती व देना बँकेकडेच जास्त लक्ष पुरविण्याचें आपलें ध्येय निश्चित केलें होतें.

इंडियन बँक्स असोसिएशन ( हिंदी बँक संघ ) स्थापन करण्यांत त्यांनीं प्रथमपासूनच पुढाकार घेतला होता, व तिची स्थापना त्यांच्याच प्रेरणेनें झाली. या संस्थेचे पहिले अध्यक्ष सर होमी निवृत्त झाल्यावर म्हणजे संस्थेच्या दुसऱ्या वर्षापासून ते १९५५ च्या मार्चपर्यंत ते संस्थेचे अध्यक्ष होते. हिंदी बँकांच्या प्रगतीसाठीं या संस्थेमार्फत त्यांनीं अविरत श्रम घेतले. संस्थेतील वेगवेगळ्या बँक-सदस्यांमध्यें एकोपा आणणें व निरनिराळ्या विचारप्रणालींचा योग्य समन्वय साधणें हें त्यांचें संस्थेतील मुख्य कार्य सांगतां येईल. कुठल्याहि प्रश्नांवर त्यामुळें त्यांनीं कटुता निर्माण होऊं दिली नाहीं. हिंदी बँकांच्या दैनंदिन कारभारामध्यें, विशेषतः व्याजाचे व हुंडणावळीचे दर यांत एकसूत्रीपणा आणण्याचे दृष्टीनें त्यांनीं आटोकाट प्रयत्न केला. मध्यंतरी बँक-चालक व नोकरवर्ग यांचेमध्यें चालू असलेल्या तंट्यामध्यें त्यांनीं समझोता होण्यासाठीं महत्त्वाची कामगिरी केली.

शेठ प्राणलालना पुण्यांत स्थापन झालेल्या पुणें बँकिंग असोसिएशनबद्दलहि सहानुभूति वाटत होती. गेल्या तीन-चार वर्षांत प्रदर्शनें भरविणें, व्याख्यानमाला सुरू करणें, कांहीं प्रकाशनें काढणें, महाराष्ट्रांतील बँकांची परिषद भरविणें, वगैरे केलेल्या उपक्रमांबद्दल त्यांना कौतुकच वाटत असे व यासंबंधींचा उल्लेख हिंदी बँक-संघांत ते वारंवार करीतहि असत. या संस्थेस त्यांची नुसती सहानुभूति होती, एवढेंच नव्हे तर त्यांनीं [illegible]ें बँकिंग असोसिएशनला सढळ देणगी देऊन आपला जिव्हाळा [illegible]क्त केला होता. या संस्थेस त्यांनीं अनौपचारिकरीत्या [illegible]-तीन वेळां भेटहि दिली होती व तिनें भरविलेल्या प्रदर्शनाचें त्यांनीं उद्घाटनहि केलें होतें. या संस्थेतर्फे आम्हीं ज्या ज्या वेळीं त्यांचेकडे सल्लामसलतीसाठी जात असूं त्या त्या वेळीं त्यांनीं आम्हांस अमोल सल्ला व जरूर प्रसंगीं अन्य मदतहि दिली आहे. त्यांच्या सल्ल्याचा आम्हांस अनेकदां फायदा झाला आहे.

शेठ प्राणलाल हे इंडियन मर्चंटस चेंबरचेहि ( हिंदी व्यापारी संघटनेचे ) अध्यक्ष होते. शिवाय अन्य व्यापारी संस्थांशींहि त्यांचा निकटचा संबंध होता व त्या त्या सर्वांना वेळप्रसंगीं उदार देणग्या देऊन त्यांनीं मदत केली होती. शिवाय 'स्वदेशीलीग' या संस्थेचेहि ते पुरस्कर्ते होते. तिच्या संस्थापनेंत त्यांनीं बराच पुढाकार घेतला होता व तिचे ते अध्यक्षहि होते. स्वदेशी वस्तूंचें उत्पादन व वापर हें या संस्थेचें व प्राणलाल शेठजींचेंहि ब्रीद होतें. स्वदेशी वस्तूंचें उत्पादन कसें वाढेल, त्यांच्याबद्दलचा गैरसमज दूर होऊन भारतीय भांडवलाखालीं भारतांतील लोकांकडून उत्पादन झालेल्या वस्तूंचा खप कसा वाढेल, यांवर त्यांचें सारखं लक्ष असे. त्यामुळेंच पर्यायानें त्यांचा आयुर्वेदाकडेहि जास्त ओढा होता. शिवाय त्यांचा संस्कृत भाषेचाहि अभ्यास दांडगा होता. जें जें 'भारतीय' असे, त्या त्या बद्दल त्यांना नेहमीं आपुलकी वाटे.

त्यांच्यामुळेंच मला हिंदी बँक-संघाच्या कार्यकारी मंडळावर काम करण्याची संधि मिळाली, व तेथेंच त्यांचा नि माझा जास्त निकट परिचय झाला. त्यांच्या निधनानें त्यांनीं स्थापन केलेल्या संस्थांची व भारतीय बँकांची हानि झालीच आहे, पण वैयक्तिक दृष्ट्या माझीहि मोठी हानि झाली आहे.

ईश्वर त्यांचे आत्म्यास चिर शांति देवो हीच प्रार्थना करून मी ही श्रद्धांजली अर्पीत आहें.

चिं. वि. जोग

---

## सुएझ कालव्याचें राष्ट्रीयीकरण

प्रेसिडेंट नासरनें सुएझ कॅनॉल कंपनीचें राष्ट्रीयीकरण जाहीर केलें आहे. त्या कंपनीच्या वार्षिक ३½ कोटि पौंडांच्या उत्पन्नाचा विनियोग अस्वान धरण बांधण्याकडे करण्यांत यावयाचा आहे. अस्वान धरण बांधून नाइल नदीचें पाणी शेतीस उपलब्ध करून देण्याची इजिप्तची योजना अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांच्या मदतीच्या नकारामुळें आतां मागें पडणार नाहीं, अशी कल्पना आहे. सुएझ कालवा इजिप्तनें आपल्या ताब्यांत घेतला, ह्याचा ग्रेट ब्रिटन व फ्रान्स ह्यांना राग आला आहे. ग्रेट ब्रिटननें इजिप्तवर आर्थिक शस्त्र उपसलें आहे आणि त्याच्या परराष्ट्रीय व्यापारास अडथळा येईल असे हुकूम काढले आहेत. इजिप्त सुएझ कंपनीच्या भागिदारांना भागांची चालू दरानें किंमत देण्यास तयार आहे; ग्रेट ब्रिटननें आपल्या राष्ट्रांतील धंदे स्वतःकडे घेतले तेव्हां ते ह्याच तत्त्वावर. तेव्हां, इजिप्तच्या ह्या राष्ट्रीयीकरणास ग्रेट ब्रिटन किंवा फ्रान्स ह्यांना आक्षेप घेतां येणार नाहीं. सुएझचा कालवा इजिप्तच्या हद्दींतून वहात असल्याकारणानें, तो त्या देशाचा अंतर्गत प्रश्न आहे. पाश्चात्य राष्ट्रांना जगांतील सर्व मोक्याच्या ठिकाणांवर प्रभुत्व ठेवण्याची दीर्घ काळ लागलेली संवय मोडणें कठीण जाणें स्वाभाविक आहे; पण त्याला इजिप्तचा इलाज काय ? कालव्यांतून होणाऱ्या दक्षिणोत्तर वहातुकींत ग्रेट ब्रिटनकडे व इतर पाश्चिमात्य देशांकडे जाणाऱ्या तेलाच्या बोटींचें प्रमाण मोठें आहे; ही वहातुक अबाधित आपल्या हातीं रहावी अशी त्या देशांची इच्छा आहे. ग्रेट ब्रिटन हाच सुएझ कंपनीचा सर्वांत मोठा भागदार आहे; सर्वांत ग्रेट ब्रिटनच्याच जास्त बोटी ह्या कालव्याचा उपयोग करतात आणि कंपनीच्या उत्पन्नाला सर्वांत अधिक हातभार लावितात.

## राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ

### रुपयांतील आकडे दिशाभूल करतील

सा. न. वि. वि.

पंचवार्षिक योजनांमुळें अपेक्षित सुधारणांमध्यें पुष्कळदां शब्दांवर बराच भर असा प्रकार होणार असा दाट संशय येतो. पंचवार्षिक योजनांमुळें "राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ" होणार या कल्पनेनें जनता भाराऊन गेली आहे. असें सांगण्यांत येतें कीं, १९५१ सालीं हिंदुस्थानचें माणशीं वार्षिक उत्पन्न २५५ रु. होतें तें १९७६ मध्यें ५१० रुपये म्हणजे १९५१ च्या दुप्पट होईल. वरवर पहाणारास ही गोष्ट आनंदाची वाटेल व वाटते. ती खरोखरच तशी आहे कीं कसें हें आपण पाहूं.

वरील अपेक्षित वाढ आनंदाची ठरण्यामागें दुसरी एक अपेक्षा गृहीत असते व ती म्हणजे वस्तूंच्या किंमती कायम रहातील, ही. समजा १९५१ मध्यें खाद्यधान्य रुपयास २ शेर होतें. १९७६ मध्यें जर तोच भाव असेल व माणशीं उत्पन्न २५५ रु. वार्षिक होतें तें ५१० रुपये झालें तर पूर्वीच्या मानानें प्रत्येक इसमाची क्रयशक्ति दुप्पट होईल. पण भाव कायम रहातील तर !

२५ वर्षांनंतर भाव काय रहातील याचा योग्य व बिनचूक अंदाज करूं शकणारा आढळणें कठीण ! पण पूर्वानुभवावरून पडताळा मात्र बघता येण्यासारखा आहे. १९२६ व १९५१ या दोन सालांतील बाजारभावांची तुलना आपणांस करतां येतें. कारण, तेथें अंदाजाचा प्रश्न नसून प्रत्यक्षांत त्या त्या वर्षांतील भाव-वाढीचा आहे. १९२६ सालीं धान्य रुपयास ८ शेरांपेक्षा जास्त मिळत असे. १९५१ सालीं तेंच धान्य रुपयास फार तर २ शेर मिळत असे. इतर मालांचे भावहि सरासरी त्याच प्रमाणांत वाढले.

समजा एकाद्या कुटुंबांत मासिक प्राप्ति १९५१ सालीं १०० रुपये होती ती २५ वर्षांनीं म्हणजे १९७६ सालीं २०० रुपये झाली. आंकडा मोठा दिसला तरी तो दिखाऊच असणार; कारण १०० रुपयांची सध्यां जी क्रयशक्ति आहे त्याच्या दुपटीइतकी क्रयशक्ति २०० रुपयांत २५ वर्षांनीं होणार असली तर निव्वळ रुपयांचें आंकड्यांत झालेली राष्ट्रीय उत्पन्नांतील वाढ हा फायदा समजावयाचा का ? सरकारनेंहि राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ होईल असें सांगतांना लोकांची दिशाभूल होईल अशा तऱ्हेनें सांगूं नये. स्पष्टपणें सांगावें, कीं क्रयशक्तींत अमुक इतकी वाढ किंवा घट होणार आहे. विकास योजनांवर मोठा खर्च करूनहि क्रयशक्ति जर कमी होणार असेल तर त्या योजनांना विकास योजना हें नांव देणें चूक. असल्या योजनांनीं विकास होईल, कीं क्षय होईल, हें सांगणें कठीण आहे असें म्हणावयाचें असल्यास तसें स्पष्ट सांगावें. लोकांची दिशाभूल होईल अशी भाषा तरी वापरूं नये.

सारांश, स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे माणशीं वार्षिक उत्पन्न २५५ रुपयांऐवजीं ५१० रुपये झालें तरी क्रयशक्ति मात्र पूर्वीच्या निम्मी ( निदान पूर्वीपेक्षा हमखास कमी ) होणार ही गोष्ट नजरेआड होऊं देऊं नये.

न. स. जोशी

### भारतांतील चहाचा खप

१९५२–५३ मध्यें भारतांत १७·५ कोटी पौंड चहा खपला होता, १९५४–५५ मध्यें १८·३ कोटी पौंड चहाचा खप झाला. १९५२–५३ मध्यें ७,८७,३७८ एकरांत चहाची लागवड झाली होती, ती १९५४–५५ मध्यें ७,८९,४७१ एकरांवर गेली.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.**

**शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखा:–पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) — श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स

## आग्नेय आशिआंत जपानी भांडवल

आग्नेय आशिआंतील देश हे जपानच्या मालाची महत्त्वाची बाजारपेठ आहेत. पण ह्या देशांत आपलें व्यापारी बस्तान बसविण्यासाठी नुसत्या मालाची निर्यात करून भागत नाहीं असें जपानमधील धंदेवाल्यांना आढळून येत आहे. म्हणून ह्या देशांत भांडवलाची निर्यात करण्याची मोहीम जोरानें चालू करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. आग्नेय आशिआंतील कच्च्या मालाच्या उत्पादनांत आणि कारखान्यांत स्थानिक भांडवलाच्या सहकार्यानें जपाननें आपलें भांडवल गुंतविलें तर जपानला अधिक फायदा होईल असा जपानच्या सरकारचा अंदाज आहे. भांडवल गुंतविल्यामुळें जपानला कच्च्या मालाच्या उपलब्धीचीं अधिक ठिकाणें मिळतील. जपानच्या यंत्रसामुग्रीला बाजारपेठ लाभेल आणि जपानी तंत्रज्ञांना नवें व्यवसायक्षेत्र मिळेल असा त्यांचा अंदाज आहे. आपलें उद्दिष्ट साध्य करण्यासाठी जपान तीन प्रकारचे उपाय योजीत आहे. ज्या जपानी कंपन्या परदेशांत भांडवल गुंतवीत असतील त्यांना अधिक द्रव्यसाहाय्य देण्यांत येणार आहे. हा पहिला उपाय. तांत्रिक साह्याच्या बाबतींत जपान टेक्निकल असिस्टन्स कंपनी ह्या नांवाची एक कंपनी काढण्यांत येणार आहे. ह्या कंपनींत २६ मोठ्या कारखान्यांचे प्रतिनिधी असतील. आग्नेय आशिआंतील सरकारांना मलभूत स्वरूपाचा तांत्रिक सल्ला कंपनीतर्फे मिळण्याची सोय करण्यांत येईल. जपानमधील जें भांडवल परदेशांत गुंतविलें जाईल त्यापैकी ६० टक्के भांडवलाला विम्याचें संरक्षण दिलें जाणार आहे. युद्ध अगर सरकारी मालकीच्या जोखमीसाठी हें संरक्षण दिलें जाणार आहे.

---

## औद्योगीकरणाचे सामाजिक परिणाम

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या शैक्षणिक, शास्त्रीय आणि सांस्कृतिक उपसंघटनेतर्फे कलकत्ता येथें एक संशोधन-केंद्र स्थापन करण्यांत आलें आहे. आशिआ खंडाचें औद्योगीकरण गेल्या कांहीं वर्षांत होऊं लागलें आहे. हें औद्योगीकरण होत असतांना त्याचे सामाजिक परिणाम काय होतील ह्यासंबंधीं संशोधन करण्याचें कार्य केंद्र करणार आहे. केंद्राचें संचालकत्व प्रो. मार्शल ह्यांच्याकडे आहे. संशोधनाचें कार्य सरकारी पातळीवरून होणार असलें तरी त्या कामांत भारतामधील विद्यापीठें आणि शास्त्रज्ञ ह्यांचें सहकार्य मिळविण्यांत येणार आहे. संशोधनासंबंधींचे विषय अद्याप निश्चित ठरविण्यांत आलेले नाहींत. त्यापैकी एक विषय असा आहे. पुष्कळदां असें आढळतें कीं, एखाद्या विशिष्ट प्रकारच्या कारखान्यांत बसविलेली यंत्रसामुग्री व तेथें काम करणारा कामगार-वर्ग एकाच तऱ्हेची असतात. पण असें असूनसुद्धां अशा प्रकारच्या कारखान्यांतील काम करण्याची परिस्थिति निरनिराळ्या ठिकाणीं वेगवेगळी असते. असें कां असावें, ह्याविषयीं केंद्र संशोधन करणार आहे. कामगार-संघटनांचा कामगारांच्या सामाजिक स्थानावर काय परिणाम होतो त्याविषयींहि संशोधन करण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें कामगारविषयक सामाजिक कायदे आणि संकेत ह्यांच्यांतील फरकाबद्दलहि संशोधन होणार आहे. केंद्राचा खर्च दरसाल सुमारें १,३०,००० डॉलर्स येईल. त्यापैकी ३५,००० डॉलर्स खर्च भारतीय सरकार दरसाल देणार आहे. त्याशिवाय कलकत्ता शहरांतील मध्यवर्ती ठिकाणीं योग्य अशी इमारतहि सरकार पुरविणार आहे.

## आस्वान धरणास मदत नाकारली

आस्वान धरण बांधण्यासाठी इजिप्तला मदत करण्यास ग्रेट ब्रिटन व अमेरिका ह्यांनीं नकार दिला आहे. ह्या नकाराचें कारण राजकीय आहे आणि आर्थिक कारणें मात्र पुढें करण्यांत येत आहेत. (१) नाइल नदीच्या पाण्याच्या वाटणीबद्दल तिच्या तीरावरील राज्यांत ऐकमत्य होऊं शकलेलें नाहीं; आणि (२) ज्यावेळीं मदत देऊं केली होती, त्यावेळेच्या मानानें आतां धरणाची योजना यशस्वी करण्याचें इजिप्तचें सामर्थ्य अनिश्चित दिसत आहे, असें सांगण्यांत येत आहे. कर्नल नासरचें धोरण अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांना पुरेसें पोषक नसून, इजिप्त रशियाकडे कलत आहे, त्यामुळें इजिप्तचें महत्त्व व त्याचें सामर्थ्य वाढणें त्या दोन राष्ट्रांना गैरसोईचें वाटूं लागलें आहे. अमेरिकेनें मदत नाकारली, म्हणजे कर्नल नासरचें पुढारीपण नष्ट होण्यास साहाय्य होईल, अशी अमेरिकेची कल्पना आहे. धरण पुरें झालें, तर त्याखालील पाण्यावर कपाशीची लागवड वाढेल आणि त्यामुळें अमेरिकेंतील कपासवाल्यांना स्पर्धा निर्माण होईल, अशीहि भीति व्यक्त केली जात आहे. आस्वान धरणाचे द्वारां "दुसरा सुएझचा कालवा" निर्माण करण्याचा अमेरिकेचा व ग्रेट ब्रिटनचा राजकीय डाव होता त्याणि त्याला इजिप्त बळी पडत नाहीं असें दिसतांच त्या देशांनीं मदत देण्याचें वचन परत घेतलें. परदेशीय मदतीवर अविकसित राष्ट्रांनीं विसंबण्यांतील गुंतागुंत त्यामुळें स्पष्ट झाली आहे.

---

## बँक-नोकरांची 'सिक लीव्ह': अवार्डचा अर्थ

दि बँक ऑफ बिहारनें लेबर अपेलेट ट्रायब्यूनलकडे, बँक-नोकराच्या 'सिक लीव्ह' बाबत विचारणा केली होती. आजारीपणाच्या रजेचा हिशेब ज्या दिवशीं नोकराची नोकरी पक्की झाली, त्या दिवसापासून करण्यांत यावा, असें नोकरांचें म्हणणें होतें; तर सिक लीव्हला एप्रिल, १९५३ पासून (बँक अवार्डच्या तारखेपासून) प्रारंभ होतो, असें बँकेचें म्हणणें होतें. ट्रायब्यूनलनें (श्री. एफ्. जिजीभॉय) नोकरांचें म्हणणें अवार्डला धरून आहे, असें ठरविलें. ह्या अवार्डप्रमाणें, नोकरीच्या प्रत्येक वर्षाला १ महिना, ह्याप्रमाणें कमाल १२ महिने एवढी सिक लीव्ह नोकराला मिळूं शकते.

---

## बँक-नोकरांचा महागाईभत्ता कमी करण्यास कारण घडलें आहे काय?

चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत रहाणीच्या खर्चाचा इंडेक्स १० पॉइंटसपेक्षा अधिक उतरला असल्यानें, बँक-नोकरांच्या महागाई भत्त्यांत कपात करण्याचा बँकांचा विचार आहे. गजेंद्रगडकर कमिशननें अशी कपात करण्यांत यावी असें सुचविलेलें होतें. गेल्या सहामाहींत इंडेक्स नंबराची सरासरी १० पॉइंटसपेक्षा जास्त खालीं गेलेली नाहीं, असें बँक-नोकरांचें म्हणणें आहे. ही सरासरी काढण्याच्या पद्धतीसंबंधीं शंका उपस्थित झाली आहे. महागाईभत्ता कमी करण्यास गजेंद्रगडकर कमिशनच्या निवाड्याप्रमाणें कारण घडलेलें आहे किंवा नाहीं, हें ठरवून घेण्यासाठी सरकारनें ह्या प्रश्नाचा विचार इंडस्ट्रिअल डिस्प्यूटस (बँकिंग कंपनीज) डिसिजन्स ॲक्ट, १९५५ च्या ६ व्या कलमाप्रमाणें लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचे सभासद श्री. रुबेन, ह्यांचेकडे सोंपविला आहे.

## आयुर्वेदीय अर्कशाला लिमिटेड, सातारा.

### पंधरावी वार्षिक सर्वसाधारण सभा

### डॉ. वि. ल. आगाशे यांचें अध्यक्षीय भाषण

आपल्या कंपनीला या वर्षी म्हणजे १९५५ अखेर एकूण ३९२३-०-५ रुपये इतका नफा झाला असून त्यांत मागील सालची शिल्लक जमा करतां एकूण रु. ४३२४-४-४ इतका नफा होतो.

या सालीं एकूण विक्री १,९५,९५३-१४-० इतकी झाली असून सेल्सटॅक्स रु. ९०८०-१४-६ वगळल्यास व्यापारी कमिशन वगळूनहि आपली विक्री १,८६,८७३-२-६ इतकी झाली आहे. गेल्या चार वर्षांचे विक्रीचे आंकडे पुढीलप्रमाणें आहेत.

| | |
|---|---|
| १९५२ | १,११,९८०-९-० |
| १९५३ | १,१७,४८३-८-६ |
| १९५४ | १,२३,१२९-९-० |
| १९५५ | १,८६,८७३-२-६ |

यावरून पहिल्या तीन वर्षांतलि प्रगतीचें प्रमाण निश्चित पण मंद असून या वर्षांत हीं विक्री सुमारें पंचेचाळीस हजारांनीं अधिक आहे. ही वाढ स्पृहणीय आहे असें मी म्हणेन.

१९४९ सालीं कंपनीच्या व्यवहाराची प्रत्यक्ष जबाबदारी माझेवर टाकली त्यावेळीं कंपनीकडे ठेवीदारांच्या ६८,५०८ रुपयांच्या ठेवी होत्या. आपल्याला आज ठेवीपोटीं फक्त ४०,१५० रुपये इतकेंच देणें आहे. तसेंच कंपनीची वार्षिक विक्री फक्त ६०,००० रुपये होती. आज हा आंकडा तिपटीहून पुढें गेला आहे.

औषधांवरील विक्रीकरासंबंधीं प्रश्न अजूनहि सुटलेला नाहीं. आसवें, आरिष्टें, हीं मद्यार्क म्हणून संबोधण्यांत चूक होत आहे हें अजूनहि सरकारच्या ध्यानीं येत नाहीं. त्यामुळें मादक द्र विक्रीकराचा फार मोठा बोजा जनतेवर पडत आहे व त्या विक्रीवर फार अनिष्ट परिणाम होत आहे. कित्येक जीवनोपयो पदार्थांप्रमाणेंच औषधांवर विक्रीकर लादलाच जाऊं नये अ तऱ्हेच्या सूचना वृत्तपत्रांतून येत आहेत व कांहीं प्रांतिक सरक (पश्चिम बंगाल) त्यांचा विचारहि करीत आहेत. पण अजून मत प्रभावी होत नाहीं.

खेळत्या भांडवलाचाहि प्रश्न अजून सतावतोच आहे. पेरल्य शिवाय जसें पिकत नाहीं, तसेंच खर्च केल्याशिवाय जमाहि हो शकत नाहीं. पण खर्च करायचा तर खेळतें भांडवल पाहि कच्च्या औषधींच्या मोठमोठ्या खरेद्या, स्वस्त मोसमांत आवश्य तो कच्चा माल भरून ठेवणें, पॅकिंग करतां फार मोठा बाटल्यांचा सांठा, आदि गोष्टी भांडवल हाताशीं नसल्यामुळें करतां ये नाहींत व त्यामुळें उत्पादन खर्च वाढलाच जातो. आधुनि यंत्रसामुग्री, विद्युत् पुरवठा, वगैरेच्या मदतीनेंहि हा खर्च क करतां येईल. पण याबाबतहि भांडवलाचीच अडचण उभी राह वहातुकीचे दरहि दिवसेंदिवस वाढत आहेत. शिवाय, वहातु सर्वस्वीं परावलंबी आहे. भागीदार बंधु-भगिनींनीं याबाबतींत क मार्गदर्शन केल्यास-म्हणजे आणखी भांडवल पुरविल्या आपली प्रगति अधिक द्रुतगतीनें करणें सोपें होईल व त्या फळ आपल्याला फार लवकर दिसूं लागेल.

### कुर्डुवाडी-मिरज रेल्वेमार्ग ब्रॉड गेजचा होणार

कुर्डुवाडी-मिरज या नॅरो गेज मार्गाचें ब्रॉड ग्रेज मार रूपांतर करण्यासाठी प्राथमिक पाहणीस रेल्वे खात्यानें (रे बोर्डे) मंजुरी दिली आहे. यासाठी २,६८,४४६ रु. खर्च येईल.

### पुणें विद्यापीठांत आणखी कॉलेजें येणार

मराठवाड्यांतील कॉलेजें पुणें विद्यापीठाला जोडण्यांत येती असें समजतें.

## ठेवींची व्याजाच्या दरानुसार छाननी

(१९५५ अखेरचे आंकडे) (आंकडे कोटी रुपयांचे)

| व्याजाचा दर | शेड्यूल्ड बँका | | | | | | बिगर शेड्यूल्ड | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रमुख शेड्यूल्ड बँका | | एक्सचेंज बँका | | सर्व शेड्यूल्ड बँका | | | |
| | रक्कम | एकूणशीं % | रक्कम | एकूणशीं % | रक्कम | एकूणशीं % | रक्कम | एकूणशीं % |
| १. ०% | १९७.० | ३१.८ | ५१.३ | २७.४ | २६०.१ | २६.२ | ५.० | ७.४ |
| २. त्यापुढें ¼% पर्यंत | ७९.० | १२.७ | ४५.१ | २४.१ | १५५.५ | १५.६ | १.८ | २.५ |
| ३. त्यापुढें ½% पर्यंत | ३.० | ०.५ | ०.२ | ०.१ | १०.२ | १.० | ३.९ | ५.८ |
| ४. त्यापुढें १% पर्यंत | ७६.२ | १२.३ | २.२ | १.२ | ८४.५ | ८.५ | २.१ | ३.१ |
| ५. त्यापुढें १½% पर्यंत | ५४.२ | ८.८ | १४.० | ७.५ | ८४.२ | ८.५ | ३.५ | ५.१ |
| ६. त्यापुढें २% पर्यंत | १५.० | २.४ | २४.९ | १३.३ | ५३.२ | ५.३ | ६.८ | १०.० |
| ७. त्यापुढें २½% पर्यंत | २८.६ | ४.६ | ९.५ | ५.१ | ४९.७ | ५.० | ४.९ | ७.५ |
| ८. त्यापुढें ३% पर्यंत | १२७.८ | २०.६ | ३६.२ | १९.४ | १९६.४ | १९.८ | १३.३ | १९.५ |
| ९. त्यापुढें ४% पर्यंत | ३३.८ | ५.५ | २.८ | १.५ | ८५.८ | ८.६ | १०.७ | १५.८ |
| १०. त्यापुढें ५% पर्यंत | ५.५ | ०.९ | ०.७ | ०.४ | १३.५ | १.४ | १२.२ | १८.० |
| ११. ५% पुढें | | | | | | | ३.८ | ५ |
| एकूण | ६२०.२ | १००.० | १८७.० | १००.० | ९९३.३ | १००.० | ६७.९ | १०० |

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छा[illegible] व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ [illegible]